| | |
|---|---|
| MHGO040006052025 | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांच्या न्यायालयात, ता. आमगांव.**<br>(पिठासीन अधिकारी श्री ए. आर. जोशी)<br>[न्यायनिर्णय दि. ०८/०५/२०२६]<br>**सं.फ़ौ.ख.क्र. ३०६/२०२५**<br>**कालावधीःव.०१,म.०१,दि.०३. नि. क्र.०९** |
| | (गु.र.क्र.३८८/२०२४, पोलिस स्टेशन: सालेकसा, जि.गोंदिया ) |

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन,**<br>पोलीस स्टेशन, सालेकसा,<br>ता. सालेकसा जि. गोंदिया. |
| **सहा. सरकारी वकील** | | **विधिज्ञ श्री एम. के. बोरीकर.** |
| **आरोपी** | | **चमरु लोधी भलावी,**<br>वयः ५४ वर्षे, व्यवसाय–शेती,<br>रा. दानीटोला ता. सालेकसा जि. गोंदिया. |
| **आरोपीचे वकील** | | **विधिज्ञ श्री पी. पी. थेर.** |

| | |
|---|---|
| **घटना घडल्याचा दिनांक** | दि. ०६.११.२०२४. |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | दि. ०६.११.२०२४. |
| **फिर्यादची तारीख** | दि. ०६.११.२०२४. |
| **दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख** | दि. २९.०३.२०२५. |
| **फिर्याद दाखल तारीख** | दि. ०५.०४.२०२५. |
| **आरोपीवर दोषारोप ठेवल्याची तारीख** | दि.१८.१२.२०२५. |
| **पुरावा सुरू झाल्याची तारीख** | दि. ११.०३.२०२६. |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख** | -- |
| **न्यायनिर्णय तारीख** | दि. ०८.०५.२०२६. |
| **आरोपीला शिक्षा सुनावल्याची तारीख** | -- |

## आरोपीची माहिती

| | |
|---|---|
| **आरोपीचे नाव** | चमरु लोधी भलावी, |
| **अटकेची तारीख** | -- |
| **आरोपीला जामिनावर सोडल्याची तारीख** | दि. ०५.०४.२०२५. |
| **दोषारोप** | मा. दा. का. कलम- ६५ (ई)(ब)(क)(ड)(फ) प्रमाणे. |
| **शिक्षा देण्यात आली कि निर्दोष सोडण्यात आले** | निर्दोष सोडण्यात आले. |
| **देण्यात आलेली शिक्षा** | -- |
| **आरोपी केस दरम्यान किती दिवस तुरूंगात होता** | -- |

## साक्षीदारांची यादी / बचावपक्ष / कोर्ट साक्षीदार

**अ) अभियोगपक्ष :**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच) |
|---|---|---|
| अ.सा.१ | सिंधु तिलकचंद घरत, | जप्ती पंच साक्षदार (नि. क्र. ०६) |

**ब) बचावपक्ष :**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क) कोर्ट साक्षीदार:**

| साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे नाव | साक्षीदार कोणत्या प्रकारातील आहे. (प्रत्यक्षदर्शी, पोलिस, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ कोर्ट निशाणी क्र.

अ) अभियोगपक्ष

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ०७ | जप्ती पंचनामा |

ब) बचावपक्ष

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क) कोर्ट

| क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ड) मुद्देमाल

| क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

:: न्या य नि र्ण य ::

(दिनांक ०८ मे २०२६ रोजी घोषीत)

प्रस्तुतचा खटला मुंबई दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई)(ब)(क)(ड)(फ) अंतर्गत चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाचे संक्षिप्त अभिकथन असे की, दिनांक ०६.११.२०२४ रोजी ०९:४५ ते ११:३० वाजताचे दरम्यान मौजा दानीटोला, ता. सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपी नामे चमरु भलावी हा त्याच्या ताब्यातील शेतामध्ये २६१० किलो सडवा मोहा प्रती १००/- रुपये किलो प्रमाणे २,६१,०००/- रुपयाचा माल, १० लिटर हा. भ. दारु प्रत्येकी किंमत २००/- रुपये प्रमाणे २०००/- रुपये व १० किलो सडवा मोहा प्रती किला १००/- रुपये प्रमाणे एकुण किंमत १०००/- तसेच इतर साहित्य अस एकुण २,६८,१००/- रुपयेचा माल

विना पास परवाना अवैधरित्या जवळ बाळगून विक्री करताना मिळून आले. म्हणून त्याच्याविरुद्ध पोलीस ठाणे सालेकसा येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

०३. सदर फिर्यादीवरुन सालेकसा पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ३८८/२०२४ दाखल झाला व गुन्ह्याचा तपास स. फौ. संजय रामप्रवेश चौबे, यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान, त्यांनी जप्ती पंचनामा, सी. ए. फार्म, साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली व तपासात आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्याच्याविरुध्द तपासाअंती दोषारोपत्र दाखल केले.

०४. आरोपपत्रावरुन दखल घेऊन या न्यायालयाने आरोपीविरूध्द मुंबई दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई)(ब)(क)(ड)(फ) अन्वये दोषारोप नि. क्र. ०४ अन्वये निश्चित केले. आरोपीने निवेदन करुन दोषारोप मान्य नसल्याचे कळविले आहे व संपरीक्षेची मागणी केली.

०५. मी अभियोगपक्षाचे व आरोपीच्या वतीने त्याचे विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले व न्यायपटावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता माझेपुढे काही मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे मी माझे निष्कर्षासह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०६.११.२०२४ रोजी ०९:४५ ते ११:३० वाजताचे दरम्यान मौजा दानीटोला, ता. सालेकसा जि. गोंदिया येथे आरोपी याने त्याच्या ताब्यातील शेतामध्ये २६१० किलो सडवा मोहा प्रती १००/- रुपये किलो प्रमाणे २,६१,०००/- रुपयाचा माल, १० लिटर हा. भ. दारु प्रत्येकी किंमत २००/- रुपये प्रमाणे २०००/- रुपये व १० किलो सडवा मोहा प्रती किला १००/- रुपये प्रमाणे एकुण किंमत १०००/- तसेच इतर साहित्य असे एकुण २,६८,१००/- रुपयेचा माल विना पास परवाना अवैधरित्या जवळ बाळगून विक्री करण्याच्या अपराध केला ? | नकारार्थी. |
| **२.** | आदेश काय ? | अंतिम |

आदेशाप्रमाणे.

**<u>कारणमिमांसा</u>**

०६. अभियोगपक्षाने खटल्याच्या पृष्ट्यर्थ केवळ एक साक्षीदार तपासले आहे. पंच सा. क्र. १ सिंधु तिलकचंद घरत यास नि. क्र. ०६ वर साक्ष नोंदविली. अभियोगपक्षाने नि. क्र. ०८ वर पुर्शिस दाखल करुन, त्यांचा साक्षीपुरावा बंद केला. अभियोगपक्षाचा पुरावा बंद केल्यानंतर आरोपी क्र. १ व २ यांचे भारतीय न्याया सुरक्षा संहिता कलम ३५१(१)(ब) अन्वये नि. क्र. ०९ वर निवेदन नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५१(१)(ब) अन्वयेच्या निवेदनातील प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरून त्यांच्याविरुध्द खोटा खटला दाखल करण्यात आल्याचा त्यांचा बचाव असल्याचे दिसून येते.

**<u>साक्षीपुरावाः</u>**

०७. पंच सा. क्र. सिंधु तिलकचंद घरत यांनी त्याच्या सरतपासात असे कथन केले ओ की, त्यांना पोलिसांनी सात ते आठ महिण्यापुर्वी दानीटोला येथे दारु पकडलेल्या जागेवर बोलविले होते. घटनास्थळावर दारु बनविण्याचे साहित्य व मोहा फुलाची दारु होती. पोलिसांनी घटनास्थळावरुन ड्रम, भिजवलेले मोह फुल व दारु बनविण्याचे इतर साहित्य जप्त केले होते. त्यांच्या समक्ष मौका जप्ती पंचनामा तयार केला सदर जप्त पंचनामा नि. क्र. ०७ वर आहे. त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे असे त्यांनी सांगितले आहे.

०८. सदर साक्षदाराचे आरोपीतर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आले. त्यात त्यांनी मान्य केले की, पोलिसांनी त्यांना पंचनामा करिता लेखी नोटीस दिली नव्हती. घटनास्थळाची जागा कोणाच्या मालकीची आहे हे दाखविण्यासाठी ग्राम पंचायतचे घटनास्थळी हजर कर्मचारी नव्हते. तो तंटामुक्ती समितीचे सदस्य आहे व त्याचे पोलिस स्टेशनला येणे–जाणे असते. पुढे त्यांनी असे मान्य केले की, पोलिसांनी त्यांच्या समक्ष पंचनामा तयार केले होते परंतु त्यांना वेळ नसल्याने त्यांनी पंचनामा वाचला नाही. तसेच आरोपीतर्फे विचारण्यात आलेले इतर प्रश्नांचे साक्षदाराने नकारार्थी उत्तर दिले.

<u>**मुद्दे क्र. १ करिताः**</u>–

०९. फौजदारी प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप हे संशयापलीकडे जावून सिध्द करणे अपेक्षित आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की पंच सा. क्र. १ सिंधु तिलकचंद घरत यांनी पंचनामा सिद्ध केला असला तरी पोलिसांनी त्यांना पंचनामा करीता लेखी नोटीस दिली नव्हती. तसेच पोलिसांनी पंचनामा त्यांच्या समक्ष तयार केला असला तरी त्यांनी पंचनामा वाचला नाही. याशिवाय त्यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, तो तंटामुक्ती समीतीचे सदस्य असल्याने त्यांच्या पोलिस स्टेशनला नेहमी येणे –जाणे असते. त्यामुळे तो पोलिसांच्या बाजुने साक्ष देतील याची शक्यता नाकारता येत नाही.

१०. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी अथवा तपासी अधिकारी यांची देखील साक्ष अभियोग पक्षाने नोंदवलेली नाही. फिर्यादी अथवा तपासी अधिकारी यांची साक्ष अभियोग पक्षाने का नोंदवली नाही याचा खुलासा देखील अभिलेखावरती आलेला नाही. त्यामुळे मात्र पंच सा. क्र. १ सिंधु तिलकचंद घरत यांच्या पुराव्यावर अवलंबुन राहुन आरोपीला दोषी ठरता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप हे संशयापलीकडे जावुन सिध्द केले नाही असे माझे स्पष्ट मत आहे. सबब, मी मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप हे संशयापलीकडे जावुन सिध्द केले नाही असे माझे स्पष्ट मत आहे. सबब, मी मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

११. परिणामी, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नोंदवण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी **चमरु लोधी भलावी** यास मुंबई दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई)(ब)(क)(ड)(फ) अन्वये गुन्ह्याच्या दोषारोपातून भारतीय नागरीक संहिता कलम २७८(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीने भारतीय न्याय संहिता कलम ४८१–अ अन्वयेची पुर्तता

करावी.

३. जप्त मुद्देमाल म्हणजे, १० लिटर मोहाफलाची हा. भ. दारु प्रत्येकी २००/– लिटर प्रमाणे एकुण २०००/– रुपये आणि १० किलो सडवा मोहाफास व इतर साहित्य अपील कालावधीनंतर नष्ट यावे.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.05.08 15:02:35 +0530

[ ए. आर. जोशी ]

दिनांकः– ०८.०५.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.